पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/८४२/२०१७
दिनांक – २१/०४/२०१७

प्रति,

मा.............................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - २६/०४/२०१७ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २६/०४/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – ६**

दिनांक - २६/०४/२०१७ वेळ – दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २६/०४/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.३/८०/६८/२०१६-१७ अन्वये सेक्टर क्र. 10 व से.क्र.12 टाकी वरूनपाणीपुरवठा होणा-या भागात वितरण नलिका टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी मे.जय गणेश एंटरप्रायजेस निविदा रक्कम रू.४१,९२,१५९/- (अक्षरी र.रू.एकेचाळीस लाख ब्यान्नव हजार एकशे एकोणसाठ फक्त) पेक्षा ७.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.४०,९३,६४३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांच्या बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस महापालिका सार्वत्रिक निवडणूक–2017 करीता व्हिडीयो चित्रीकरण करणेकामी अल्प मुदत ई नि.सु.क्र.73/2016-17 अन्वये लघुत्तम निविदाकार मे. राहुल फोटो व्हिडीओ काळेवाडी यांचे प्रति व्हिडीओ कॅमेरा, दोन कॅमेरामनसह,कॅमेरा शुटींग घेऊन कॅसेट स्वरुपात सीडीज पाहण्यासाठी 32 इंची TVसेट सर्व साधनांसह इ.प्रतिदिन र.रु.1258/- प्रतिदिन हे अंदाजपत्रकीय दर र.रु.2200/- पेक्षा लघुत्तम असल्यानेमा.आयुक्त सो. यांचेकडील दि.18/01/2017 रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. मे. राहुल फोटो व्हिडीओ काळेवाडी यांचेकडुन याकामी करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला आहे. तरी उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व मे. राहुल फोटो व्हिडीओ काळेवाडी यांनी सार्वत्रिक 2017 करिता केलेल्या व्हिडीओ चित्रीकरणचे प्रत्यक्ष कामकाजा प्रमाणे येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.३) प्रस्तावात नमूद केल्या प्रमाणे पुलांचे Condition Surveywith NDT करुन अहवाल सादर करण्यासाठी मे. सी.व्ही.कांड कन्स.प्रा.लि. यांना हॅरीस ब्रिज (जुना) यासाठी र.रु. ४,००,०००/- + सेवाकर इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च जे.एन.एन.यू.आर.एम. या लेखाशिर्षाखालील मुंबई पुणे रस्ता दापोडी हॅरीस ब्रिज येथे उड्डाणपुल बांधणे या अंदाजपत्रकीय पान क्र. ६२३ अ.क्र. ९ यावर करता येईल त्यासाठी सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात र.रु. ६.५० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच सदरचे काम तातडीचे व विशेष स्वरुपाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५(२) (२) नुसार थेट पध्दतीने करारनामा 'न' करता या क्षेत्रातील तज्ञ कन्स्लटंट मे. सी.व्ही. कांड कन्स्लटंट प्रा.लि. यांना देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील एकूण ४१ स्मशानभूमी/दफनभूमी चे ठिकाणी स्वच्छता व सुरक्षा ठेवणेसाठी काळजीवाहक नेमणेकामी वैद्यकिय विभागामार्फत निविदा नोटिस क्र.१२-२०१२/१३ प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार पात्र ३६ संस्थांना स्मशानभुमी/दफनभुमीचे ठिकाणी ८ तासासाठी र.रु.३०९/- प्रतिदिन प्रति काळजीवाहक या दराने व ०५ धर्मादाय संस्थांकडील काळजीवाहकांना र.रु.७,०७९/- दरमहा या दराने ३ काळजीवाहक पुरविणेचे काम देण्यात आले होते. सदर कामाची मुदत दि.३१/१२/२०१६ रोजी संपुष्टात आल्याने कार्यरत ४१ संस्थाना/ठेकेदारांना दिनांक ०१/०१/२०१७ ते दिनांक ३१/०५/२०१७ पर्यंत अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.५५,७०,०९७/- (अक्षरी र.रू. पंचावण्ण लाख सत्तर हजार सत्यान्नव फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.५) मा.सहव्यवस्थापकीय संचालक पुणे महानगरपरिवहन महामंडळ यांनी पत्र क्रं.पीएमपीएमएल/मुलेविअ./४४४/ दि.२६/०९/२०१६ अन्वये सन २०१५-१६ मध्ये देण्यात आलेल्या विविध प्रकारच्या सवलतीच्या दरातील पासेसपोटी र.रू.२१,५०,११,२१४/-ची मागणी केली असुन त्यापोटी आगावू स्वरूपात र.रू.१८,००,००,०००/- मा.स्थायी समिती ठराव क्रं.१५९४८ दि.०५/०४/२०१६ चे ठरावा प्रमाणे यापुर्वीच अदा करण्यात आली आहे. मा.आयुक्त यांचे कडील दिनांक १८/३/२०१६ चे मान्य प्रस्तावा नुसार र.रू. २,३७,८०,८८७/- विविध प्रकारचे पासेस पोटी.मा.स्थायी समितीचे उमेद मान्यतेवर समायोजन करण्याच्या अटीस अधीन राहून अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.६) मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.२३/२०१६-१७ इ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उद्याने सुशोभिकरणासाठी रोपे खरेदी व नुतणीकरण करणेकामी मे.

अथर्व स्वयं.आद्योगिक सेवा.सह.संस्था मर्या यांचे कोटेशन नोटीस अंदाजपत्रकिय दर.रू.१,९२,९३५/- (अक्षरी र.रू.एक लाख ब्यान्नव हजार नऊशे पस्तीस फक्त) अंदाजपत्रकिय दरानुसार या दराचे कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/६/कावि/७१/२०१७ दि.९/०१/२०१७ अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील रस्ते,गटर्स यांची दैनंदिन साफ सफाई होणे नागरिकांचे आरोग्याशी संबंधीत असुन सदर साफसफाई न झाल्यास नागरिकांचे आरोग्यावर विपरीत परीणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचे काम बंद करणे उचित होणार नाही. सदर कामाची नविन निविदा कार्यवाही सुरु असुन त्यास काही अवधी लागणार आहे. तरी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या ६८ (स्वंयरोजगार/बेरोजगार) संस्थाकडून ६ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाईसाठी कार्यरत असलेल्या प्रस्तावात नमुद ९२५ कामगारांचे कामास दि.१/४/२०१७ पासून ४ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होवुन नवीन संस्थांना नेमणुक आदेश देईपर्यंत या पैकी जी प्रक्रिया प्रथम होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस सद्याचा किमान वेतन दर र.रु.१२,३९२.४२ प्रमाणे ९२५ कामगारांचे मासिक खर्च र.रु.१,१४,६२,९८९/- नुसार ४ महिने कालावधीसाठी र.रु.४,५८,५१,९५६/-चे अपेक्षित खर्चास, त्यांचेशी मुदतवाढ कालावधीचा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यास तसेच प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३६ पैकी नजीकचे २ स्मशानभूमी/ दफनभूमी येथे २४ तास ७ काळजीवाहक प्रती दिन ( साप्ता, सुट्टी सह) पुरविणेच्या प्रस्तावात नमूद १-१८ संस्थानी सादर केलेले दर स्विकृत करणे, त्यानुसार संस्थाची ०२ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार म्हणून नेमणूक करणेस, त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेस व या कामी राज्य शासन निर्णयानुसार दर ०६ महिन्यांनी कामगारांचे किमान वेतन दरामध्ये विशेष भत्याचे होणा-या वाढीसह येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य विभागास आवश्यक ४.५ घन मिटर क्षमता बीन्स कंटेनर म.न.पा.ड्रॉईंग/डिझाईन/स्पेशिफिकेशन/नमुन्या प्रमाणे खरेदी कामी ऑनलाईन ई.निविदा सुचना क्र.१३/२०१६-१७ अन्वये प्रसिध्द करून ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. त्यानुसार ऑनलाईन पाच निविदा

दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.स्मितल इंजिनिअरींग वर्क्स, पुणे यांचे ४.५ घनमिटर क्षमता बीन्स कंटेनर एकूण-७५ नग (बाब क्र.१) साहित्यासाठी र.रु.३६,२४,७५०/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. मनपाचे आरोग्य विभागाकरीता ४.५ घनमिटर क्षमता बीन्स कंटेनर खरेदी करणे आवश्यक आहेत. सदरचा खर्च हा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २४.४८% ने कमी असल्याने सदरचे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी २०१७ मध्ये होणार आहे. मा.राज्य निवडणूक आयोगाने दि.८ डिसेंबर २०१६ चे पत्रान्वये मनपा हद्दीतील मतदारांची मतदानाबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती व्हावी यासाठी महापालिकेने सर्व प्रसार/प्रसिध्दी यंत्रणांचा अवलंब करून जनजागृती करणेबाबत कळविले आहे. तदनुसार महापालिकेने शहरामध्ये व गस्तीच्या ठिकाणी तसेच झोपडपट्टीमध्ये पथनाट्ये सादर करणे, फ्लेक्स व होर्डींग लावणे, महिला बचत गटांद्वारे मतदार जनजागृती करणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा घेणे, कामगारांचे मेळावे घेणे, ज्येष्ठ नागरिक संघ व घरकुल वासियांचे मेळावे घेणे, शहरातील गॅस वितरकाद्वारे मतदान करणेबाबतचे स्टिकर्स वितरीत करणे, मॅरेथॉन स्पर्धा व सायकल रॅली स्पर्धा आयोजित करणे, रिक्षास स्टिकर्स लावणे, रेडिओ मिर्ची, वृत्तपत्रे, सोशल मिडीया, ऑडीओ व्हिडीओ क्लिप यांच्यामार्फत प्रचार करणे इ. उपक्रम राबवून जनजागृती करणेबाबत मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर कार्यक्रमांच्या अनुषंगाने तातडीच्या होणा-या खर्चासाठी अंदाजे र.रु. ८१,३६,५००/- (अक्षरी र.रू.एक्क्याऐंशी लाख छत्तीस हजार पाचशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.११) वृक्ष संवर्धन विभागाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१७-१८ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे. मा.वृक्ष प्राधिकरणांने सभा ठराव क्र.१४ दिनांक २८/११/२०१६ अन्वये मान्यता दिलेली आहे. सन २०१६-२०१७ च्या ६ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ६ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कम नमूद केलेल्या आहेत. सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१७,६८,९१,०००/- चे व सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१७,६१,५६,०००/- यास मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१२) सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मनपाच्या विद्युत विभागासाठी विविध प्रकारचे विद्युत साहित्य खरेदीबाबत ई निविदा सुचना क्र.28/2016-17 अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.शक्ती फिक्सर्स प्रा.लि. यांचे दर पत्रकातील बाब क्र.1 या साहित्याचे दर र.रू.5,01,000/- मे. हायटेक इलेक्ट्रिकल्स यांचे बाब क्र.5 व 6 या साहित्याचे दर र.रु.15,41,500/- व मे. ब्राईटशाईन असोसिएटस यांचे बाब क्र.3 व 4 या साहित्याचे दर र.रु.2,13,600/- व मे.सुरज स्विचगेअर कंपनी यांचे बाब क्र.2 व 7 च्या साहित्याचे दर र.रु.5,20,800/- असे एकूण 1 ते 7 बाबींचे दर र.रु.27,76,900/- चे दर सार्वत्रिक निवडणूक 2017 चे तातडीचे कामाचे अनुषंगाने स्विकृतीस मा.आयुक्त सो. यांनी दि.25/01/2017 अन्वये मान्यता दिलेली आहे. यानुसार सदर पुरवठाधारकांकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत केला आहे. सदर प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व र.रु.27,76,900/- च्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१३) सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता आवश्यक छपाई साहित्य खरेदीकामी ई निसुक्र. 43/2016-17 अन्वये लघुत्तम निविदाकार 1) मे जयगणेश ऑफसेट यांचे एकूण 54 बाबी र.रु.8,82,201/- २) मे आशिष एंटरप्रायजेस यांचे एकूण 50 बाबी र.रु.9,08,100 3) मे.गणराज प्रिंटर्स यांचे एकुण बाबी 60 साठी एकुण र.रु.9,29,025/- 4) मे.अमृत मुद्रणालय, यांचे एकुण बाबी 10 साठी एकुण र.रु.9,70,722/- असे एकुण 174 बाबी साठी एकुण र.रु.36,90,048/- (अक्षरी र.रु. छत्तीस लाख नव्वद हजार अठ्ठेचाळीस फक्त) चे खर्चास मा आयुक्त सो. यांनी दि 27/1/2017 अन्वये मान्यता दिलेली आहे. यानुसार सदर पुरवठाधारकाकडून करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला आहे. सदर प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व र.रु.36,90,048/- च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २६/४/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.१४) मनपाचे करआकारणी व करसंकलन विभागास सन 2017-18 या आर्थिक वर्षाकरीता आवश्यक मनपा नमुन्याप्रमाणे प्रिप्रिंटेड मिळकतकर बिले छपाई करुन खरेदीबाबत मध्यवर्ती भांडार विभागाने ई निविदा सु.क्र.61/2016-17 अन्वये मे.विशाल एंटरप्रायजेस रहाटणी यांचे लघुत्तम दर प्रती नग र.रु.0.99/- प्रमाणे नोटीस छपाई कामी एकुण र.रु.9,30,600/- मध्ये खरेदी करणेस मा.सहाय्यक आयुक्त भांडार यांनी मान्यता दिलेली आहे. मे.विशाल एंटरप्रायजेस रहाटणी यांचेकडील लघुत्तम दर एकुण र.रु.9,30,600/- मध्ये छपाई करुन पुरविणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१५) सार्वत्रिक निवडणूक 2017 करीता मे व्ही.एम.शिंदे, पिंपळे गुरव यांचे कडील बाब क्रं 13 ई-नि.सु.क्र.28/2015-16 अन्वये प्राप्त लघुत्तम मंजुर दरानुसार मनपा सार्वत्रिक निवडणुक 2017 करिता जन जागृतीकामी आवाहन पत्रकांची मनपा नमुन्या प्रमाणे छपाई टप्या टप्याने प्रति शेकडा 95/- प्रमाणे एकुण 14000 शेकडा एकुण र.रु.13,30,000/- मध्ये खरेदी करणेस मा.सहा.आयुक्त भांडार यांचेकडील दि.21/1/2017 व 8/2/2017 रोजीच्या प्रस्तान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे व्ही.एम.शिंदे, पिंपळे गुरव यांना सार्वत्रिक निवडणुक 2017 करिता जन जागृतीकामी आवाहन पत्रकांची मनपा नमुन्या प्रमाणे छपाईकामी पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१६) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.५/३७/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.7 च-होली वडमुखवाडी येथे नविन विकसीत होणा-या भागात ठिकठिकाणी पाईपलाईन टाकणेकामी (2016-17) मे. पी. व्ही. देशमुख निविदा रक्कम रू.३२,२१,०४८/- (अक्षरी र.रू.बत्तीस लाख एकवीस हजार अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा ६.१३% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३१,७४,७७७/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१७) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.३/२७/२०१६-१७ अन्वये देहू रस्ता परिसरात वितरण नलिका टाकणेकामी मे. संजय कॉन्ट्रॅक्टर निविदा रक्कम रू.५५,८७,९६०/- (अक्षरी र.रू.पंचावन्न लाख सत्त्याऐंशी हजार नऊशे साठ फक्त) पेक्षा ५.५०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५५,४४,६५३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१८) मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील नि.नो.क्र.६६/४/१६-१७ च-होली ७ दाभाडेवस्ती ते च-होली गावठाण ३० मी डि.पी. रस्ता विकसित करणेकामी मे.अजवानी इंफ्रा.

प्रा.ली. नि.र.रु ४,६६,११,१२८/- (अक्षरी र.रू.चार कोटी सहासष्ठ् लाख अकरा हजार एकशे अठ्ठावीस फक्त) पेक्षा १५.००% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.४,१६,००,४३२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीकदरा मध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक-राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २६/०४/२०१७ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.१९) यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयातील सध्या कार्यरत असलेले मानधनावरील विविध पदे (नविन) या पदांवर जे कर्मचारी नेमलेले आहेत त्यांची मूदत दि.०६/०२/२०१७ रोजी संपुष्ठात येत असल्याने प्रस्तावा सोबतचे प्रपत्रामधील पदांना विशेष बाबब म्हणुन दि. ७/२/२०१७ रोजी १ दिवस सेवा खंडीत करुन दि.०८/०२/२०१७ पासुन दि.०७/०४/२०१७ पर्यंत पुढे २ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देवुन मुदतवाढीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रूग्णालयास तातडीने आवश्यक औषधे/साहित्याची खरेदी ही, रूग्णालयाचे अंदाजपत्रकातील औषध खरेदी या लेखाशिर्षातुन (र.रू.५०,००,०००/-) व मनपाचे इतर दवाखाने/रूग्णालये यांना तातडीने आवश्यक औषधे/साहित्याची खरेदी ही, मुख्य औषध भांडाराकडील “औषध खरेदी” या लेखाशिर्षातून करणेकामी निविदा क्र.१/२०१६-१७ वाय.सी.एम.रूग्णालय औषध भांडार द्वारे निश्चित झालेल्या मे.कोठारी मेडिकल ॲन्ड सर्जीकल,संत तुकारामनगर, पिंपरी-१८ यांचे समवेत करारनामा व अनामत रक्कम भरणे बाबत एजन्सी धारकास Branded औषधांचे MRP वर १०.६% सुट Generic औषधांचे MRP वर ५४% सुट व सर्जीकल साहित्याचे MRP वर ४५% सुट या दराने दोन वर्षे कालावधी करिता पुरवठा आदेश देणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/६/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.६१ दापोडी मुख्य रस्त्याचे हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.क्लीन्सी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. नि.र.रू.35,01,401/- (अक्षरी रक्कम रुपये पस्तीस लाख एक हजार चारशे एक फक्त) पेक्षा 10.25% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.32,99,633/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६३/२/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र. ६१ दापोडी मुख्य रस्त्याचे कडेने पावसाळी गटरसाठी पाईपलाईन टाकणेकामी मे.श्रीकृपा एन्टरप्रायझेस नि.र.रू.35,01,400/- (अक्षरी रक्कम रुपये पस्तीस लाख एक हजार चारशे फक्त) पेक्षा 22.50% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.28,49,264/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४२/५१/२०१६-१७ प्रभाग क्र.२६ मध्ये जुने डी पी रस्ते विकसित करणेकामी M/s. H.A.Bhosale. नि.र.रु.१८,६७,२७७/- (अक्षरी अठरा लाख सदुसष्ठ हजार दोनशे सत्याहत्तर फक्त) पेक्षा १४.२०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१६,८२,२३०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन आदेश निर्गत केला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.५८/१-२०१६-१७ मुंबई पुणे बीआरटीएस रस्त्यावरील विविध सेवा वाहिन्यांसाठी खोदलेला रस्ता व पदपथ यांचे चर पुर्ववत करणेकामी मे.एच.सी.कटारिया नि.र.रु.९३,३५,६३५/- (अक्षरी र.रू.त्र्यान्नव लाख पस्तीस हजार सहाशे पस्तीस फक्त) पेक्षा १४.६०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.८३,७१,२६४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२५) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रू.१३५/- कोटी (अक्षरी.र.रू.एकशे पस्तीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट, र.रू.८४/-कोटी विविध प्रकारचे

पासेस र.रू.२३/- कोटी व बसेस खरेदी र.रू.२८/- कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून प्रतीमाह रक्कम रूपये ६ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रू.१.५० कोटी असे एकूण र.रू.७.५० कोटी (अक्षरी.र.रू.सात कोटी पन्नास लाख फक्त) माहे एप्रिल २०१७ ते फेब्रुवारी २०१८ अखेर ११ महिने अग्रीम स्वरूपात अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आरोग्य विभागाचे सहा. आरोग्यधिकारी यांस कार्यालयीन कामकाजा करीता वापरात असणारे वाहन क्र.एम.एच.१४ सि.एल. २४९ टाटा सुमो या वाहनांचे टायर ट्युब खरेदी करणेकामी मा. आयुक्त यांच्या कडील आदेश क्र. कक्षेका/आ१५ब/कावि/९५०/२०१६ दि. २५/१०/२०१६ अन्वये र.रू.२३,७८८/- (अक्षरी र.रू.तेविस हजार सातशे अठ्ठ्याऐंशी फक्त) आगावू घेतलेली होती. त्यापैकी र.रू.२३,७८८/- खर्च झाली असुन जादा र.रू.२१२/- (अक्षरी र.रू.दोनशे बारा फक्त) खर्च झाला असुन र.रू.२४,०००/- (अक्षरी र.रू.चौवीस हजार फक्त) इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. सदरचे वाहन क्र.एम.एच.१४ सि.एल.२४९ टाटा सुमो या वाहनांचे टायर ट्युब खरेदी करणेकामी प्रत्यक्ष झालेला एकुण र.रू.२४,०००/- (अक्षरी र.रू.चौवीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२७) पिंपरी चिचंवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत सांगवी दापोडी व नवी सांगवी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेकामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र कक्षेका/आ१५/कावि/२९३/१७ दि.२१/०१/२०१७ अन्वये र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख फक्त) आगावू घेतलेली होती. सदरचे कामकाज मा.आयुक्त साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार थेट पध्दतीने विभागामार्फत रोजाने कर्मचारी लावून व जे.सी.बी.च्या सहाय्याने करणेत आलेले आहे. दि.२७/०१/२०१७ ते ०१/०३/२०१७ अखेर एकूण २०० मनुष्यबळाचा वापर करून र.रू.१,००,०००/- इतका खर्च करणेत आला असून दि.२७/०१/२०१७ ते ०१/०३/२०१७ अखेर एकूण २०० मनुष्यबळावर र.रू.१,००,०००/- इतका खर्च करणेत आलेला आहे. सदरचा एकूण खर्च र.रू.१,००,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला असल्याने पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्रत्यक्ष झालेला एकूण र.रू.१,००,०००/-(अक्षरी र.रू.एक लाख फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२८) यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाने मागणी केलेनुसार त्यांचे विभागातील Terumo Penpol कंपनीचे प्लॅटलेट एजिटॅटर या उपकरणाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक पार्टस संबंधित उत्पादित कंपनी Terumo Penpol यांचेकडून एकूण र.रु.३२,०६०/- निविदा न मागवता, करारनामा न करता थॅट पध्दतीने खरेदी

करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२९) यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या डायलिसिस विभागातील गॅंब्रो कंपनीची डायलिसीस मशीन (Sr.No.6999) (HIV +ve) च्या दुरुस्तीकामी आवश्यक पार्ट– Motor for Fluid Pumpएकूण र.रु.१७,३०७/- हा Baxter India Pvt.Ltd .यांचे अधिकृत स्पेअर पार्ट विक्रेते M/S.VEE AAR TECH SOLUTION, New Delhi यांचेकडून निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेकामी पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असुन Baxter India Pvt.Ltd यांनी संबंधित मशीन दुरुस्त करुन दिले असल्यामुळे झालेल्या खर्चाचे अवलोकन करणे.

विषय क्र.३०) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजूरीकामी सादर केलेल्या अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३१) मौजे पिंपरी वाघेरे येथील सन ३२२/५ पै यासी सि.स.न. ६७७६ पै मधिल १८.०० मी रस्त्याने बाधित क्षेत्राची खाजगी वाटा घाटीने मनपाच्या ताब्यात घेणेकामी रस्त्याने बाधित मिळकतधारकांना मा. महापालिका सभा ठराव क्र.७७४, दिनांक २०/११/२०१५ मधिल मान्य धोरणानुसार नुकसान भरपाई अदा करणेकामी येणारा खर्च तसेच प्रस्तावात नमूद खरेदीखत करणेकामी येणारा खर्च जसे स्टॅंप फी, रजिस्ट्रेशन फी, वकिल फी, स्टेशनरी टायपिंग इत्यादी स्वरुपाचा खर्च असा एकुण खर्च महानगरपालिकेस करावा लागणार आहे. तसेच सदर रस्त्याची बाधित जागा ताब्यात घेण्यासाठी मा. खाजगी वाटाघाटी समितीच्या बैठकीमधील निर्णयास अधिन राहून नुकसान भरपाई व इतर खर्च अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३२) महानगरपालिकेच्या ITI मोरवाडी/कासारवाडी येथे विविध २० व्यवसायांचे प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून रोजगार तथा स्वयंरोजगार मिळविणे संस्थेचे उद्दिष्ट आहे. त्याकरीता इतर अदयावत कोर्सेस प्रशिक्षणार्थींना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या NSDC, शासनाच्या MSSDS अंतर्गत Skill Development संबंधित विविध शॉर्ट टर्म कोर्सेस राबविण्यात येतात. सदर कोर्सेस प्रशिक्षणार्थी तसेच नागरिकांसाठी उपलब्ध करून दिल्यास शासनाचे Skill Development mission साध्य करता येईल व येथील युवा वर्गाला रोजगार तथा स्वयंरोजगार मिळवण्याचे सामाजिक कार्य मनपास निश्चितच पार पाडता येईल. या करीता प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे धोरण निश्चित करणेस मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणे बाबत विचार करणे.

विषय क्र.३३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.44/20/2016-17 अन्वये प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील त्रिवेणीनगर चौक ते गणेशनगर पर्यंत २४ मी.रुंद रस्त्याचे आधुनिकिकरण करणेकामी मे.एच.सी.कटारीया नि.र.रु.56,01,005/- (अक्षरी र.रु.छप्पन लाख एक हजार पाच फक्त) पेक्षा 13.60% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.50,81,232/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/८४२/२०१७
दिनांक - २१/०४/२०१७

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.